ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २७ एप्रिल, १९५५ | अंक १७

## विविध माहिती

**इंडियन रोडस् कॉंग्रेसचें अधिवेशन**—इंडियन रोडस् कॉंग्रेसचें १९ वें अधिवेशन श्रीनगर येथें जून १८ ते जून २५ पर्यंत भरणार आहे. अधिवेशनाला देशाच्या निरनिराळ्या भागांतून ३०० च्या वर रस्त्याचे एंजिनिअर्स हजर राहातील असा अंदाज आहे. अधिवेशनाच्या निमित्तानें एंजिनिअरिंग—तांत्रिक वस्तूंचें एक प्रदर्शनहि भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत राज्य—सरकारांचीं सार्वजनिक बांधकामखातीं भाग घेणार आहेत.

**पंजाब नॅशनल बॅंकेचा हीरक महोत्सव**—पंजाब नॅशनल बॅंकेचा हीरक महोत्सव बडोदा येथें मुंबई राज्याचे अर्थ-मंत्री डॉ. जिवराज मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना डॉ. मेहता म्हणाले कीं, ज्या देशाच्या खेड्यांतील लोकांना पतीचे व्यवहार करतांना लोभी सावकारांवर अवलंबून रहावें लागतें, त्या देशाची प्रगति होणें अशक्य होऊन बसतें.

**कच्छ राज्यांत दारूबंदी**—कच्छ राज्यांत दारूबंदी करण्यास मध्यवर्ती सरकारनें राज्य-सरकारला अनुज्ञा दिली आहे, असें समजतें. कच्छमधील कॉंग्रेस-संघटनेचा ह्याबद्दल बरेच दिवस आग्रह चालला होता. राज्य-सरकारनें दारूबंदी केल्यास उत्पन्नांत दरवर्षी सुमारें १,००,००० रुपयांची तूट येईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. मुंबईला व सौराष्ट्राला होणारी दारूची बेकायदा निर्यात थांबविणें हा संकल्पित दारूबंदीचा मुख्य उद्देश आहे.

**सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण?**—कोलार येथील सोन्याच्या खाणी अधिक फायदेशीर रीतीनें चालवितां येणें शक्य करण्याच्या हेतूनें त्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें, अशी सूचना म्हैसूर सरकारतर्फे मध्यवर्ती सरकारला करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्यासंबंधीं भारतीय सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठीं म्हैसूरचे मुख्य मंत्री पुढील महिन्यांत दिल्लीला जाणार आहेत.

**आंध्र राज्यांतील विजेचा पुरवठा**—आंध्र सरकारनें ग्रामीण विभागांतील लोकांना विजेचा पुरवठा करण्याचें कार्य झपाट्यानें चालविलें आहे. गेल्या वर्षी ४०० खेड्यांना वीज पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्याच गतीनें आणखी सहा वर्षें राज्य—सरकारला विजेचा पुरवठा करतां येईल. तथापि इतकें करूनहि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राज्यांतील १६,००० खेड्यांपैकी २,५०० खेड्यांनाच विजेचा पुरवठा होऊं शकेल.

**चोरट्या सोन्यांत वाढ**—लपून छपून चोरट्या मार्गानें सोनें आणण्याविरुद्ध भारत सरकारनें कडक उपाय योजलेले असताहि अशा सोन्याच्या गुप्त आयातींत वाढ होत आहे, असें समजतें. भारतामधील सोन्याच्या उत्पादनाची दैनिक सरासरी २,००० तोळे आहे. परंतु सोन्या—चांदीचे व्यापारी दररोज सरासरी ६,००० तोळ्यांची विक्री करतांना आढळतात. ह्यापैकी बहुतांश सोनें गुप्तपणें आयात झालेलें असतें.

**विंध्य प्रदेशांतील हिऱ्याच्या खाणी**—विंध्य प्रदेशांतील हिऱ्यांच्या खाणींचें काम कसें चालतें, त्याचा अभ्यास करून त्यासंबंधीं अहवाल तयार करण्यासाठीं भारतीय सरकारनें आठ जणांची एक कमिटी नेमली आहे. कमिटीनें आपला अहवाल ता. १ जूनपर्यंत सरकारला सादर करावयाचा आहे.

**अमेरिकेनें दिलेल्या कर्जाचा विनियोग**—भारताला अमेरिकेनें ४·५ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलेलें आहे. त्यांपैकी २·५ ते ३ कोटी डॉलर्सचा विनियोग अमेरिकेकडून गहूं आणि कापूस खरेदी करण्यासाठीं होत आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ही सर्व खरेदी चालू आर्थिक वर्षांत पूर्ण होईल असा अंदाज आहे. चालू सालीं रशिआनें आर्थिक मदत देऊं केलेली नाहीं, असेंहि सांगण्यांत आलें.

**सुरत लोकल बोर्डाची कामगिरी**—मार्च, १९५४ अखेर पुऱ्या झालेल्या तीन वर्षांत सुरत जिल्हा लोकल बोर्डानें लोकोपयोगी कामावर २८ लाख रुपयांच्यावर रक्कम खर्च केली. ह्या कालांत १६२ मैल लांबीचे नवे रस्ते बांधण्यांत आले, १५० विहिरी व २० तळीं खोदण्यांत आलीं. चालू वर्षी अशाच प्रकारच्या कामावर बोर्ड २१॥ लाख रुपये खर्च करणार आहे.

**पूर-नियंत्रणासाठीं अणुशक्तीचा उपयोग**—नद्यांना येणारे पूर नियंत्रित करण्यासाठीं नद्यांचीं पात्रें खोल करणें अगर जरूर तेथें तीं सरळ करून घेणें, असे उपाय सुचविण्यांत येतात. ह्या कामीं अणुशक्तीचा उपयोग करतां येईल अशा वार्ता पसरल्या होत्या. पण अणु-तंत्र-विज्ञानाची सध्यांची अवस्था लक्षांत घेतां असा उपयोग करतां येण्यासारखा नाहीं, असा खुलासा भारतीय सरकारतर्फे करण्यांत आला आहे.

**संरक्षण-खात्यासाठीं नवी इमारत**—भारताच्या संरक्षण—खात्यासाठीं नवी दिल्ली येथें नवीन इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतीसाठीं ४ कोटी रुपये खर्च येणार असून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस होईल. ह्या इमारतींत भारताच्या संरक्षण खात्याची तर सोय होईलच, पण त्याशिवाय मुख्य सेना—कार्यालयहि तींतच थाटण्यांत येईल.

**चीनमधील पुनर्घटना**—रेव्हरंड ऑसबोर्न नांवाचे एक मिशनरी चीनमध्यें २० वर्षें राहून परत चालले आहेत. चीनमधील नव्या राजवटीनें चालविलेल्या पुनर्घटनेसंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, कम्युनिस्ट राजवटीनें रस्ते व रेल्वे-मार्ग ह्यांची बरीच पुनर्घटना केली आहे. त्याचप्रमाणें अफूसेवन, जुगार आणि वेश्याव्यवसाय ह्यांचेंहि उच्चाटन केलें आहे. तथापि, कोणालाहि आपला व्यवसाय निवडण्याचें स्वातंत्र्य नाहीं.

**आंध्रमधील मंदिराचा जीर्णोद्धार**—चालू वर्षी आंध्र राज्यांतील २५० प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी सुमारें २० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. सर्वच देवळें यात्रांचीं केंद्रस्थानें आहेत असें नाहीं; पण त्यांपैकी कित्येक कलेच्या व प्राचीन वास्तुशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. कांहीं लहान मंदिरांचाहि जीर्णोद्धार करण्यांत येणार आहे.


**मरहूम बॅ. जिनांची कबर**—पाकिस्तानचे संस्थापक व पहिले गव्हर्नर-जनरल, बॅ. जिना, ह्यांची मोठी कबर बांधण्याचा विचार पाकिस्तानचें सरकार करीत आहे. ह्या कामीं सल्ला-मसलत करण्यासाठी पाकिस्तानचे मुख्य एंजिनिअर हैद्राबादचे नबाब-यार-जंग ह्यांचेकडे आले होते. नबाब-यार-जंग हे चांगले वास्तु-शास्त्रज्ञ आहेत. कबरीसाठी ८० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**तंबाखूची लागवड वाढविण्यासाठी योजना**—गंतूर जिल्ह्यांत उत्तम प्रतीच्या तंबाखूच्या पिकाची वाढ करण्यासाठी राज्य-सरकारनें एक योजना तयार केली आहे. योजनेसाठी २,००,००० रुपये खर्च करण्यांत येणार असून हा प्रयोग प्रथमतः निदान दोन वर्षे तरी चालू ठेवण्यांत येईल. तंबाखूची लागवड कशी करावी, ह्याचें शिक्षण शेतकऱ्यांना तज्ज्ञांकडून देण्यांत येईल.


किर्लोस्कर



हात पंप | सेंट्रिफ्युगल पंप



उन्हाळी पिकासाठी व
घरगुती पाणीपुरवठ्यासाठी
खात्रीची उपाययोजना

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

*र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.*

डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा,
आणि भेटीदाखल द्या.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.
टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २७ एप्रिल, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## रिझर्व्ह बँकेचे दोन नवे फंड

### ग्रामीण सहकारी कर्जपुरवठ्याची योजना

रिझर्व्ह बँकेनें राज्य सरकारांच्या सहकार्यानें, सहकारी क्रेडिट संस्थांच्या पुनर्घटनेचें कामीं पुढाकार घ्यावा असें गोरवाला कमिटीनें सुचविलें आहे. ह्याप्रीत्यर्थ, राज्य सरकारांना दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला असावा, अशीहि तिची सूचना आहे. राज्य सहकारी बँका, सेंट्रल को. बँका, मोठ्या आकाराच्या प्राथमिक सहकारी पतपेढ्या, मध्यवर्ती लँडमॉर्गेज बँका, प्राथमिक लँड मॉर्गेज बँका, इत्यादींच्या भागभांडवलांत राज्य सरकारांना अप्रत्यक्ष भाग घेतां यावा, ह्यासाठी ह्या कर्जाचा विनियोग व्हावयाचा आहे. नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) फंड ह्या नांवाचा फंड रिझर्व्ह बँकेनें सुरू करावयाचा आहे.

रिझर्व्ह बँक सध्यांप्रमाणेंच, राज्य-सहकारी बँकांमार्फत, राज्य सरकारांच्या हमीवर, अल्प मुदतीचीं कर्जे देत राहील. राज्य सहकारी बँका, सेंट्रल को. बँका, इत्यादींचें भागभांडवल वाढविण्याचा एक परिणाम, रिझर्व्ह बँकेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या अल्प मुदतीच्या कर्जाचे वाढींत होईल. रिझर्व्ह बँकेनें मध्यम मुदतीचीं (१५ महिने तें ५ वर्षे) कर्जेंहि राज्य-सहकारी बँकांना आणि त्यांच्या मार्फत सेंट्रल को. बँका व सोसायट्या ह्यांना पुरवावीं. सध्यांची ५ कोटींची मर्यादा काढून टाकण्यांत यावी, त्याचप्रमाणें राज्य-सहकारी बँकांच्या स्वतःच्या भांडवलाबाबतची अटहि काढली जावी; प्रत्येक राज्य-सहकारी बँक व सेंट्रल को. बँक ह्यांच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरून रिझर्व्ह बँकेनें कर्जाची मर्यादा ठरवावी. मध्यम मुदतीचीं कर्जे नॅशनल ॲग्रिकल्चर क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) फंडांतून देण्यांत यावींत. दीर्घ मुदतीचीं (५ वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीचीं) कर्जे लँड मॉर्गेज बँकांना लागतील, तींहि ह्या फंडांतून देतां येतील. 'मार्केटेबल' डिबेंचर्स विकत घेऊन भांडवलपुरवठा करण्याची रिझर्व्ह बँकेची सध्यांची जी पद्धति आहे, ती चालूच राहील; दोन्ही बाबतींत मुद्दल व व्याज ह्यांची हमी राज्य सरकारकडून घेतली जाईल.

नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट (स्टॅबिलायझेशन) फंडाची गोरवाला कमिटीनें सूचना केली आहे, तिचा उद्देश असा: राज्य सहकारी बँका, इत्यादींना अल्प मुदतीचीं कर्जे रिझर्व्ह बँकेनें दिलीं असतील, त्यांच्यापैकीं कांहींची परतफेड दुष्काळ, अतिवृष्टि, इत्यादींमुळें वेळेवर होऊं शकत नाहीं व त्यामुळें राज्याच्या सहकारी प्रतव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे, अशा वेळीं अशा कर्जाच्या परतफेडीस तहकुबी देणें आवश्यक होईल. ह्यासाठी राज्य सरकारांना मध्यम मुदतीचीं कर्जे देण्यासाठी ह्या फंडाचा उपयोग केला जाईल. अल्प मुदतीचें कर्ज फेड झालें असें समजलें जाईल, परंतु वास्तविक त्याचें मध्यम मुदतीच्या कर्जांत (स्टॅबिलायझेशन फंडांतून) रूपांतर केलें जाईल. राज्य-सहकारी बँका, सेंट्रल को. बँका, मोठ्या आकाराच्या प्राथमिक सोसायट्या, ह्यांनीं अशाच प्रकारचे स्टॅबिलायझेशन फंड निर्माण करावे व त्यांचा प्रथम उपयोग केला जावा, असा रिझर्व्ह बँक आग्रह धरील.

नॅशनल ॲ. क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) व नॅशनल ॲ. क्रेडिट (स्टॅबिलायझेशन) फंड हे रिझर्व्ह बँकेनें मामुली व्यवहार म्हणून अंमलांत आणावयाचे आहेत; त्यांचेसाठी स्वतंत्र संस्था स्थापावयाची नाहीं. गोरवाला कमिटीच्या ह्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी रिझर्व्ह बँक-कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल लोकसभेंत मांडण्यांत आलें आहे. "सहकारी संघटनेस रिझर्व्ह बँकेस योग्य तो हातभार लावतां यावा व त्याचे द्वारां ग्रामिण कर्जपुरवठ्यांत वाढ व्हावी," असा हा दुरुस्तीच्या बिलाचा उद्देश आहे. वरीलपैकीं पहिल्या फंडाकडे रिझर्व्ह बँक प्रथम १० कोटी रुपये वर्ग करील व पुढें पांच वर्षांपर्यंत दरसाल किमान ५ कोटी रुपये वर्ग करीत राहील. दुसऱ्या फंडांत पांच वर्षेपर्यंत दरसाल किमान १ कोटी रुपये घातले जातील.

---

### गव्हाच्या उतरत्या भावावर उपाय

भारतामधील सर्वच अन्नधान्याच्या किंमती सध्या उतरत चालल्या आहेत, त्या विशिष्ट मर्यादेखालीं उतरूं न देण्याचें धोरण मध्यवर्ती सरकारनें जाहीर केलें असून त्याप्रमाणें प्रांतिक-सरकारांना सूचनाहि दिल्या आहेत. भोपाळ-राज्य-सरकारनें गव्हाच्या उतरत्या किंमती स्थिर करण्यासाठी खुल्या बाजारांत १० रुपये मण ह्या भावानें शेतकऱ्यापासून गव्हाची खरेदी तावडतोब करण्याचें ठरविलें आहे. गव्हाच्या खरेदीसाठी सुरवातीलाच लागणारी १ लाख रुपयांची रक्कम भारतीय सरकारनें मंजूर केली आहे, असें समजतें. गव्हाची खरेदी करण्यासाठी राज्य-सरकारला जो खर्च येईल तो सर्व भारतीय-सरकारचे अन्न व शेतकी-खातें सोसणार आहे. राज्य-सरकारनें गहूं किती खरेदी करावयाचा हें ठरविलेलें नाहीं. कारण, ठरविलेल्या व जाहीर केलेल्या भावाप्रमाणें जितका गहू शेतकरी-वर्ग सरकारला विकूं पाहील तितका सर्वच्या सर्व विकत घेण्याचें राज्य सरकारनें ठरविलेलें आहे. तथापि, गव्हाच्या दर्जाबद्दल मात्र सरकारनें कांहीं धोरण ठरविलेलें आहे. फक्त सरासरीनें चांगला असणारा गहूं सरकार विकत घेणार आहे. चालू हंगामांत राज्यांतील गव्हाचें उत्पादन सुमारें १,१९,००० टन होईल असा अंदाज राज्य-सरकारच्या अन्नमंत्र्यांनीं केला आहे. राज्यांतील गव्हाची गरज मात्र ९०,२०० टनांच्या आसपासच आहे. राज्यांतील खुल्या बाजारांत गव्हाची दर मणामागें किंमत जर १० रुपयापर्यंत घसरली तर सरकारला सुमारें १०,००० मण गहूं विकत घेता येईल असा हिशोब करण्यांत आला आहे. शेतीच्या मालाचा बाजार हा संघटित व केंद्रित नसल्यामुळें त्या मालाच्या किंमती वाजवीपेक्षां अधिक उतरल्या तर सर्वच अर्थव्यवस्था कालांतरानें विस्कळित होण्याचा धोका असतो.

## ब्रिटिश औद्योगिक तज्ज्ञाचा इशारा

भारतांत ब्रिटनच्या मदतीनें एक पोलादाचा कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. कारखान्यासाठीं योग्य अशी जागा निवडण्यासाठीं आणि तद्विषयक इतर बाबींचा अभ्यास करण्यासाठीं सर एरिक कोटस ह्यांच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिश पोलादविषयक तज्ज्ञ सध्या भारताचा दौरा करीत आहेत. मि. कोटस म्हणाले कीं, भारतानें आपला औद्योगिक विकास करतांना तो समतोल होईल अशी दक्षता घेतली पाहिजे. नवीन उद्योगधंदे काढण्यापूर्वी अशा उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरविणाऱ्या मूलभूत उद्योगधंद्यांचा विकास करणें जरूर आहे. उदाहरणार्थ, पोलादाचा कारखाना घ्या. असा कारखाना काढणें इष्ट आणि सोपें आहे. पण त्या कारखान्याला हजारों टन कोळसा नियमितपणें पुरवावा लागेल. नाहींतर तो कारखाना बंद पडेल. कच्च्या मालाचा संथपणें व नियमितपणें पुरवठा करणें हा प्रश्न बराच व्यापक स्वरूपाचा आहे. म्हणून भारतानें आपल्याजवळ असलेल्या नैसर्गिक साधनांची व्यवस्थित जुळवाजुळव केली पाहिजे. हीं साधनें म्हणजे खनिजें, पाणी आणि मजूर. भारताजवळ माणसांचें बळ अफाट आहे; आणि हा सर्व वर्ग आधुनिक तांत्रिक ज्ञान मिळविण्यास समर्थ असा आहे. शिवाय हा वर्ग एकंदरीनें समाधानीहि दिसत आहे. भारतांत वाहतुकीची व्यवस्था अधिक चांगली व विस्तृत करणें जरूरीचें आहे. विशेषतः विहार व बंगालमधील औद्योगिक विभागांत वाहतुकीच्या सोई वाढविणें तांतडीचें झालें आहे. उद्योगधंद्यांचा विकास झाल्यावर वाहतुकीच्या व्यवस्थेवर अधिक ताण पडणार हें निश्चित आहे. म्हणून रेल्वे-रस्त्यांचा विकास अगोदर करून घेतला पाहिजे.

---

## पेप्सु राज्याची अर्थव्यवस्था

पेप्सु राज्याचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम आतां अखेरच्या स्वरूपांत तयार झाला आहे. ह्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमापेक्षा ११ कोटी रुपये अधिक खर्च करण्यांत यावयाचे आहेत. कार्यक्रमाप्रमाणें खर्च करण्यांत यावयाची एकूण रक्कम २० कोटी रुपयांपेक्षांहि अधिक आहे. पेप्सु राज्याच्या वाढत्या आर्थिक व्यवहाराविषयीं बोलतांना राज्य-सरकारचे अर्थ-चिटणीस ह्यांनीं वरील माहिती सांगितली. ते पुढें म्हणाले कीं, चालू आर्थिक वर्षांत राज्याच्या अंदाजपत्रकांत २ कोटींची तूट भासेल. राज्याच्या कारभारावर फार खर्च होतो. पण प्रदेश सलंग नसल्यामुळें तो होत आहे. देशांतील कोठल्याहि इतर भागापेक्षा पेप्सु राज्यांत वेकारी कमी आहे. राज्याच्या शेती-प्रधान अर्थव्यवस्थेचा निर्देश करून ते पुढें म्हणाले कीं, एकूण ६४ लाख एकरांपैकी ७० टक्के जमीन दरवर्षी लागवडीला आणली जाते. जमीन सुधारणांची अंमलबजावणी भाक्रा-नांगल योजना, आणि ट्यूब वेल्स ह्या गोष्टी संपूर्ण झाल्या म्हणजे भारतामधील कोणत्याहि इतर भागापेक्षा पेप्सु राज्यांतील पाटबंधाऱ्याखालील जमिनीची टक्केवारी अधिक होईल. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी जवळ जवळ ८० टक्के जमिनीला निश्चितपणें पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. कर-चौकशीसमितीनें विक्रीकराबद्दल केलेल्या शिफारसींचा सरकार विचार करीत आहे. शिफारसी अंमलांत आणण्याचें ठरलें तर सरकारच्या उत्पन्नांत कांहीं भर पडण्याचा संभव आहे. चैनीच्या वस्तूंवरील सर्वसामान्य विक्री-कराच्या दरांत वाढ करण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे. चालू वर्षअखेरपर्यंत राज्यांतील सडकांच्या लांबींत ५० टक्के भर टाकण्याचा सरकारचा बेत आहे.

## अमेरिकेंतील वैद्यकीय संशोधन

अमेरिका हें राष्ट्र आज जगांतील सर्वच राष्ट्रांत अनेक बाबतींत पुढारलेलें आहे. तथापि, अशा राष्ट्रांतहि सार्वजनिक आरोग्य-विषयक सर्व प्रश्न सुटलेले नाहींत. लहान मुलांना होणारा पोलिओ हा रोग आतां नव्यानें निघालेल्या औषधानें काबूंत रहाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तथापि इतर कांहीं रोग अमेरिकन नागरिकांचे बळी पूर्वीप्रमाणेंच घेत आहेत. सरकारी खात्यानें गोळा केलेल्या माहितीप्रमाणें, अमेरिकेंत दर वर्षी सुमारें ७,५०,००० लोक हृदय-विकारानें दगावतात. कॅन्सरच्या विकारानें २,५०,००० लोक दरवर्षी मृत्यु पावतात. तथापि, सर्वांत बोधप्रद गोष्ट अशी कीं, मानसिक रुग्णांची संख्या चिंता वाटण्या-इतकी वाढलेली दिसून येते. अमेरिकेंतील इस्पितळांतून रोग्यांसाठीं जितक्या खाटा ठेवण्यांत आलेल्या आहेत त्यांपैकीं निम्म्यापेक्षा अधिक खाटा मानसिक व्यथा असलेल्या रोग्यांनीं अडवलेल्या आढळून येतात. ह्या रोग्यांसाठीं अमेरिकेला दर वर्षी १०० कोटी डॉलर्स खर्च करावे लागतात. वैद्यकीय संशोधनाला आर्थिक मदत म्हणून अमेरिकन सरकार दर वर्षी ८,१०,००,००० डॉलर्स खर्च करतें. ह्या रकमेपैकीं २,१०,००,००० एवढी मोठी रक्कम कॅन्सरचा प्रतिकार करण्यासाठीं खर्च केली जाते. १,६०,००,००० डॉलर्सची रक्कम हृदय-विकारासंबंधीं संशोधन करण्यासाठीं खर्च करण्यांत येते व १,४०,००,००० डॉलर्सची रक्कम मानसिक रोगांसंबंधीं संशोधन करण्यासाठीं खर्च केली. ह्या संशोधनाचें फळ काय? नॅशनल इन्स्टिट्यूट्स् ऑफ हेल्थ ह्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. स्लाइक म्हणतात, कीं कांहीं वर्षांत कॅन्सरवर नियंत्रण ठेवणें अगर तो बरा करणें शक्य होईल असें वाटतें. पण हृदय-विकाराबद्दल मात्र प्रगति फारशी झालेली नाहीं.

---

## दि बँक ऑफ कराड लि., कराड

### डायरेक्टरांचा नववा वार्षिक अहवाल

अहवालाचे वर्षी बँकेस २८,४०७ रु. नफा झाला. त्यांत शिल्लकी नफा मिळविल्यावर नफावांटणीस २९,२३६ रु. आले. त्यांचा विनियोग खालीलप्रमाणें सुचविण्यांत आला:—

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | ६,००० |
| इनव्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंड | १,००० |
| बॅड डेट फंड | १,००० |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १,००० |
| डिव्हिडंड, ४% करमाफ | ८,७१० |
| इनकमटॅक्सची तरतूद | १०,३०० |
| पुढील वर्षीत ओढले | १,२२६ |
| रु. | २९,२३६ |

बँकेचे नोकरवर्गासाठीं १९५४ चे प्रारंभापासून प्रॉव्हिडंट फंड-योजना सुरू केली आहे. तो आतां १,८४७ रु. झाला असून त्याची रक्कम ट्रस्टींच्या नांवें वेगळी ठेवलेली आहे. सातारा बँकेचा व्यवहार हळूहळू वाढत आहे.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,१८,३०० | रोख, बँकांत | ४,२१,२०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५३,००० | इनव्हेस्टमेंटस् | ९,३२,४१४ |
| ठेवी | १९,६६,७६३ | कर्जें | ९,१७,२९७ |

## बँक ऑफ औंध, लि.

**वार्षिक सभेंत चेअरमन, श्री. न. गं. जोशी, ह्यांचें भाषण**

"औंध संस्थानच्या विलीनीकरणानंतर आपली औंध बँक अत्यंत अडचणींतून गेलीं ५-६ वर्षें मार्ग आक्रमून आता भक्कम पायावर आलेली आहे व तिची प्रगति जास्त व्हावी या हेतूनेंच बँकेचे संचालक अत्यंत प्रामाणिकपणें व कसोशीनें प्रयत्न करीत आहेत. अहवालाच्या सालाची ३,२०२-९-५ या नफ्याची वाटणी झाल्यानंतर बँकेचे एकूण सर्व रिझर्व्हस् रु. ९४,००० पर्यंत होतील. बँकेच्या शेअर भांडवलाच्या मानानें व स्थैर्याच्या दृष्टीनें हे रिझर्व्हस् योग्य आहेत हें आपणांस दिसून येईल. बँकेकडे एकूण ठेवी अंदाजें अकरा लाख रु. आहेत. बँकेच्या खेळत्या भांडवलांतहि गतवर्षापेक्षा एक लाख रु. वाढ झाली आहे. बँकेकडील हातांतील कॅश व बँकांकडील चालू व मुदत ठेवींतील शिल्लक यांचें ठेवींशीं प्रमाण शेंकडा २४ व सरकारी रोखे व शेअर्स यांमधील गुंतवणुकीचें ठेवींशीं प्रमाण शेंकडा ४० पडतें. म्हणजे ठेवींच्या रकमेशीं एकूण तरतें जिंदगीचें प्रमाण ( कर्जें सोडून ) शेंकडा ६४ पडतें. यावरून बँकेच्या संचालकांचें धोरण ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें किती जागरूकतेचें आहे हें आपणांस दिसून येईल. याप्रमाणें तरता पैसा बँकिंग कंपनीज ॲक्टप्रमाणें ठेवावा लागत असल्यामुळें त्यावर व्याजाचें उत्पन्न कमी होतें व त्यामुळें बँकेस नफा कमी होतो हें जरी खरें आहे तरी ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें व बँकिंग कंपनीज् ॲक्टप्रमाणें हें धोरण अवलंबिणें केव्हांहि इष्टच आहे. एकूण ठेवींशीं कर्जाच्या गुंतवणुकीचें प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणें आपल्या बँकेनें ठेवलें आहे. दोन वर्षांपूर्वी बँकेनें मध्यम व गरीब जनतेकरतां "अल्पसंचय बचत योजना" सुरू केल्याचें आपणांस माहीत आहेच. या वैशिष्ट्यपूर्ण योजनेचा प्रसार सातारा शहरांत व शाखांच्या गांवीं दिवसेंदिवस होत आहे. अहवालाच्या सालअखेर एकूण ठेवीदार ४२५ होऊन या योजनेखालीं रु. २१,४०० ची रक्कम जमा झाली आहे. बँकेचें व तिच्या शाखांचें एकंदर कामकाज समाधानकारक असून तें दिवसेंदिवस आपल्या व इतर सर्व जनतेच्या पाठिंब्यानें वाढत आहे. सोनें गहाण व मालतारण यावर शक्य तितकीं कर्जे देण्याचें बोर्डाचें धोरण आहे. सदर व्यवहार सातारा ऑफिस व शाखा यांजकडे वाढत आहे.

---

### दि बँक ऑफ औंध, लि. चा अहवाल

दि बँक ऑफ औंध, लि. चे चेअरमन, श्री. न. गं. जोशी, बी. ए., एलएल. बी., ह्यांच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग आम्हीं वर प्रसिद्ध केला आहे, त्यावरून बँकेच्या प्रगतीची कल्पना येईलच. बँकेच्या ठेवींतील वाढ, सहकारी सोसायट्यांकडून येणें असलेल्या कर्जांत गुंतलेल्या रकमांची वसुली, भरपूर वसूल भांडवल व गंगाजळी ( २,३०,३४६ रु.), पुरेशी तरती रक्कम, इत्यादि कारणांमुळें बँकेची मजबुती वाढत गेली आहे. १९५४ च्या नफ्यांतून, मजबुती वाढविण्याच्या दृष्टीनें, डिव्हिडंड जाहीर न करण्याचें बोर्डाचें धोरण योग्यच आहे.

---

**शेती व पशुसंवर्धनासाठी नौकर**—मध्यवर्ती सरकार, शेती व पशु-सुधारणा ह्या बाबींकडे लक्ष पुरविण्यासाठी आपल्या अधिकारकक्षेंतील नौकरांचा वर्ग निर्माण करण्याचा विचार करीत आहे, अशी माहिती भारताचे शेतकी-मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांनीं लोकसभेंत सांगितली.


WILICO

**—आपली पत सुरक्षित करा—**

★ उद्योगधंद्यामध्यें माल, वाहनें वगैरेंचे विमे तत्परतेनें घेतले जातात. पण ज्या शब्दावर व पतीवर धंद्यांतील सर्व उलाढाल अवलंबून असते ती न कळत असुरक्षित ठेवली जाते, त्याची तरतूद आजच करा.

★

अधिक माहितीकरितां आजच शाखाधिकाऱ्यांना भेटा अगर लिहा.

★

—फोन नं. ३४०१—

**वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा**


पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.



दि

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

स्थापना : १९३५



भांडवल

वसूल भांडवल व गंगाजळी रु. २३,७५,०००

खेळतें भांडवल रु. ५ कोटींचे वर

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)

श्री. श्री. गो. मराठे — श्री. धों. कृ. साठे

श्री. मा. रा. जोशी — श्री. फ. दो. पदमजी

श्री. मा. वी. शहा — श्री शं. ल. किर्लोस्कर

श्री. भा. म. गुप्ते

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी:— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## पंजाब नॅशनल बँकेचा हीरक महोत्सव

दि पंजाब नॅशनल बँकेची स्थापना लाहोर येथें १३ एप्रिल १८९५ रोजीं, २० हजार रुपये भांडवलानें झाली. आतां तिच्या ३१२ शाखा असून तिचेकडे ८० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत व तिचें खेळतें भांडवल १ कोटी रुपयांवर गेलें आहे. बँकेच्या पटावर ६,३५६ नोकर असून त्यांचा दरमहा पगार ११ लक्ष रुपये आहे. भारतांतील सर्व बँकांचें मिळून २८ लक्ष खातेदार आहेत, त्यांत प्रत्येक पांचांत एक खातेदार पंजाब नॅशनल बँकेचा आहे.

बँक कित्येक गंडांतरांतून पार पडली आहे, त्या सर्वांत मोठें पंजाबच्या फाळणीच्या वेळचें होतें. त्यावेळीं, तिचे कागदपत्र, मुख्य कचेरी व तिची जिंदगी दिल्ली येथें हलविण्यांत घेतलेली दक्षता अत्यंत महत्त्वाची होती. त्यानंतर बँकेची प्रगतीच होत गेली. १९४७ मध्यें तिच्या २८१ शाखा होत्या, त्या आतां ३१२ झाल्या आहेत. इतर कित्येक बँकांना शाखावाढ आवरती घ्यावी लागली; मार्च १९४९ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या ३,०४० कचेऱ्या होत्या, त्या मार्च १९५३ मध्यें २,७२८ वर आल्या. उलट, पंजाब नॅशनल बँकेच्या १९३८ मध्यें ३८ शाखा होत्या, त्या १९४६ मध्यें १८६ झाल्या व आतां ३१२ झाल्या आहेत. ह्या शाखांची राज्यवार वांटणी खाली दिली आहे:—

**बँकेच्या शाखांचें जाळें**

| राज्य | सर्व बँकांच्या कचेऱ्या | एकट्या पंजाब नॅशनल बँकेच्या कचेऱ्या | एकूण शाखांशी प्रमाण % |
|---|---|---|---|
| "अ" राज्यें | | | |
| पंजाब | २२१ | ७० | ३१.६ |
| उत्तरप्रदेश | ४२२ | ७७ | १८.२ |
| बिहार | १५१ | १६ | १०.६ |
| मुंबई | ५८० | २७ | ४.६ |
| मध्यप्रदेश | १५१ | १८ | ११.९ |
| मद्रास | ९३० | ६ | .६४ |
| ओरिसा | १७ | १ | ५.८ |
| प. बंगाल | २३९ | ६ | ९.०९ |
| "ब" राज्यें | | | |
| हैद्राबाद | ८८ | ३ | ३.४ |
| मध्यभारत | ५८ | ९ | १५.५ |
| म्हैसूर | ११९ | ३ | २.५ |
| पेप्सु | ६४ | २१ | ३२.८ |
| राजस्थान | १२५ | १५ | १२ |
| सौराष्ट्र | ६६ | ६ | ९.०९ |
| "क" राज्यें | | | |
| अजमीर | ११ | २ | १८.१ |
| भोपाळ | ५ | १ | २० |
| कच्छ | २ | १ | ५० |
| दिल्ली | ९५ | २३ | २४.२ |
| हिमाचल प्रदेश | ७ | ३ | ४२.८ |

## चांदा येथें क्षयरोगाचें इस्पितळ

चांदा येथें क्षयरोग्यांसाठी नवें इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. मध्यप्रदेशाचे अर्थमंत्री, श्री. बियाणी, ह्यांनीं इस्पितळाच्या पायाचा दगड नुकताच बसविला. इस्पितळांत २० रोग्यांची सोय करण्यांत येणार आहे. त्यासाठी १ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यांपैकी २८,००० रुपये स्थानिक लोकांनीं जमविले आहेत.

## मुंबई राज्यांतील गोशाळा व पांजरपोळ

मुंबई राज्यांतील गोशाळांना व पांजरपोळांना मदत करून त्यांचा विकास घडवून आणण्याची सहा वर्षांची एक योजना राज्य-सरकारनें तयार केली आहे, असें समजतें. ह्या योजनेसाठी सरकार ३,१८,००० रुपये खर्च करणार आहे. दुखावलेल्या, टाकून दिलेल्या अगर इतर कारणांनीं निरुपयोगी झालेल्या गुरांची व्यवस्था ह्या संस्था करीत असतात. योजनेच्या पहिल्या वर्षी अशा प्रकारच्या दहा संस्थांना मदत करण्यांत येणार आहे. आणखी दहा संस्थांचा समावेश योजनेच्या कक्षेत पुढील सालीं करण्यांत येईल. तथापि, सरकारला योजनेचा सर्वच खर्च सोसावा लागणार नाहीं. गोसंवर्धनविषयक मध्यवर्ती कौन्सिल निम्मा खर्च देणार आहे. गुरांची पैदास, त्यांचे खाणेंपिणें व निगा राखणें, इत्यादि बाबतींत सरकारी अधिकारी वरील संस्थांना तांत्रिक सूचना देणार आहेत. त्याशिवाय, राज्यांतील गोशाळा व पांजरपोळ ह्या संस्थांच्या फेडरेशनला सरकार प्रचारासाठी दरसाल कांहीं रक्कम देणार आहे. पुष्कळशीं गुरें भाकड झालेलीं आढळून येतात. हीं गुरें प्रजाजननाला अक्षम कां होतात, त्या कारणांचा अभ्यास करण्याचीहि चार वर्षांची योजना मुंबई सरकारनें तयार केली आहे. ह्या विषयाची सांगोपांग माहिती करून घेण्यासाठी एक सरकारी अधिकारी स्वीडनला पाठविण्यांत आला आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी विभागांतील तज्ज्ञांच्या हाताखाली तो शिक्षण घेईल व मग भारतांत येऊन योजनेचें मार्गदर्शन करील. ह्या योजनेला सुमारें १,१२,००० रुपये खर्च येईल. त्यापैकीं निम्मी रक्कम इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ही संस्था देणार आहे. इज्जतनगर येथील व्हेटरीनरी इन्स्टिट्यूटच्या सूचनांप्रमाणें मुंबई राज्यांत ह्या विषयासंबंधीं संशोधनहि करण्यांत येणार आहे.

## चित्रपटनिर्मितींत भारताचा तिसरा अनुक्रम

चित्रपटांच्या उत्पादनाच्या दृष्टीनें भारताचा जगांतील देशांत तिसरा अनुक्रम लागतो. अमेरिका व जपान ह्या देशांचा अनुक्रम पहिला व दुसरा आहे. १९५३ मधील चित्रपटनिर्मितीचे देशवार आकडे खालीलप्रमाणें आहेत.:—अमेरिका ३३०, जपान ३०२, भारत २५९, हाँगकाँग २००, इटली १५०, ब्रिटन १३८, फ्रान्स १११ आणि प. जर्मनी १०१.

चिनी भाषेंतील चित्रपटांस फार मोठी मागणी निर्माण झाली आहे, त्यामुळें हाँगकाँगमधाल चित्रपटनिर्मितीस एकदम चालना मिळाली आहे. जपानमध्यें ३,७५० व भारतांत २,००० चित्रपटगृहें आहेत.

## थॉमस कुक ॲंड सन

प्रवाशांच्या वाहतुकीची व सोईची व्यवस्था करणारी ही जुनी फर्म आपली कलकत्ता येथील कचेरी बंद करीत आहे. गेलीं ५ वर्षे ही शाखा तोट्यांत होती, म्हणून हा निर्णय घेण्यांत आला आहे. ह्या शाखेंत ५३ नोकर कामावर आहेत. मुंबई, मद्रास, बंगलोर, दिल्ली व सिमला येथेंहि कंपनीच्या शाखा आहेत, त्यांतच जरूरीपेक्षा अधिक नोकर असल्यामुळें, काढून टाकण्यांत येणाऱ्या नोकरांना फर्मच्या इतर शाखांत जागा मिळण्याजोगी नाहीं.

## एअर इंडिया इंटरनॅशनलमध्यें जपानी मुली

एअर इंडिया इंटरनॅशनलच्या टोकिओ कचेरीनें ३ जपानी मुलींची एअर होस्टेस म्हणून नेमणूक केली आहे. त्या कांहीं आठवडे एअर इंडिया इंटरनॅशनलच्या मुख्य होस्टेस, मिसेस रे ग्रीनवेल, ह्यांच्या हाताखालीं शिक्षण घेतील व त्यानंतर बँगकॉक टोकियो विभागांतील विमानांत काम करूं लागतील.

### गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी कल्पक व होतकरू कारखानदारांना गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें दिलीं जातात. ज्या कारखानदारांनी एखादी नवीन वस्तु बनवून ती बाजारपेठेंत यशस्वी रीत्या खपविली असेल अशा संयुक्त महाराष्ट्रांतील कोणाहि कारखानदाराला या पारितोषिकां-साठी अर्ज करतां येईल. या पारितोषिकाकरिता आलेल्या वस्तूंचें परीक्षण करून बक्षिसें कोणास द्यावयाचीं हें चेंबरच्या पारितोषिक समितीकडून ठरविलें जातें. श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. दा. वा. पोतदार, श्री. ग. रा. साठे, श्री. म. स. पारखे व श्री. व श्री. वैद्य हे या समितीचे सभासद आहेत. पारितोषिक समितीस योग्य वाटेल त्याप्रमाणें एक किंवा अधिक पारितोषिकें दिलीं जातील. प्रत्येक पारितोषिकाची किमान रक्कम रु. १०० तरी असेल. समितीस योग्य वाटल्यास एक किंवा अधिक खास पारितोषिकेंहि दिलीं जातील व त्यांची रक्कम समिती ठरवील. सदर पारितोषिकांची रक्कम गो. स. पारखे स्मृतिदिनीं म्हणजे दि. १६ जून १९५५ रोजीं रोखीनें देण्यांत येईल व चेंबरच्या अध्यक्षांच्या सहीचें प्रशस्तिपत्रहि पारितोषिक मिळविणारांस दिलें जाईल. चालू सालच्या गो. स. पारखे-पारितोषिकांसाठी अर्ज करूं इच्छिणारांनीं चेंबरकडून त्वरित अर्जाचा नमुना मागवून घ्यावा व तो रीतसर भरून दि. १५ मे, १९५५ च्या आंत कार्यवाह, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, टिळक रोड, पुणें २ यांजकडे भरून पाठवावा.

---

### कॅनरा बँकेचे मि. फ्रीमन ह्यांना निरोप

कॅनरा बँकेच्या फॉरिन खात्याचे मॅनेजर, मि. डी. फ्रीमन, हे बँकेचे परदेशांतील प्रतिनिधि म्हणून ग्रेटब्रिटनला जात आहेत. त्यांच्या जागीं सध्याचे डेप्युटि मॅनेजर, श्री. एकनाथ कामत ह्यांची योजना करण्यांत येईल. कॅनरा बँकेच्या मॅनेजरांनीं ताजमहाल हॉटेलमध्यें श्री. फ्रीमन ह्यांच्या सत्कारार्थ दि. १९ रोजीं निरोप समारंभ घडवून आणला.

---

### LORD REAY MAHARASHTRA INDUSTRIAL MUSEUM, POONA

The following books have been received by the Museum recently:—

(1) **Sampling Theory of Surveys with Applications,** by P. V. Sukhatme, Publishers: The Indian Society of Agricultural Statistics, New Delhi. pp. 490.

(2) **Mars Spectrmetry,** by A. J. B. Robertson, Publishers: Methuen and Co. London. pp. 129. Price s. 8 6 d.

(3) **Crafts for Recreation,** by Evadra K. Perry, Publishers: Robert Hale Ltd., pp. 207 Price: s. 12 6 d.

(4) **Facts about India,** by the Publication Division Information and Broadcasting, Govt. of India. pp. 268. Price: Rs. 3-8/-.

(5) **Hindustan Year Book,** by S. C. Sarkar, Publishers: M. C. Sarkar and Sons Ltd, pp. 768. Price: Rs. 5-8/-.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### आगाखानांनीं तनखा घेणें बंद केलें

आगाखानांच्या घराण्यास १८४४ सालापासून दरमहा १,००० रु. तनखा मिळत आहे. त्यांच्या घराण्यानें ईस्ट इंडिया कंपनीची जी बहुमोल सेवा केली, तिचे प्रीत्यर्थ ब्रिटिश सरकारनें हा तनखा सुरू केला व ठेवला. आगाखानांनीं हा तनखा घेण्याचें आतां बंद केलें आहे. तनख्याची रक्कम १,००० रु. असली, तरी कर कापून घेतल्यावर त्यांचे हातीं फक्त १०० रु. च पडत असत.

---

### सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्ग, इंदापूर

पुणें जिल्ह्यांतील सर्व प्रकारच्या सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीसाठीं व होतकरू व्हर्नाक्युलर फायनल पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास ता. १२ मे १९५५ पासून मुक्काम इंदापूर तालुका इंदापूर जिल्हा पुणें येथें सुरू होणार आहे. क्लास दीड महिना चालेल. क्लासची फी रुपये तीन व परीक्षा फी रुपाया एक आहे. अर्जाबरोबर रुपये तीन पाठविले पाहिजेत. कोणत्याहि कारणास्तव फी परत केली जाणार नाहीं. तरी अर्ज व फी मे. सेक्रेटरी, पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि. १४८७ शुक्रवार पेठ, पुणें २. या पत्त्यावर तारीख ५ मे, १९५५ पर्यंत पाठवावेत. राहण्याचा व जेवण्याचा खर्च ज्यानें त्यानें स्वतंत्र करावयाचा आहे.

---

### बेळगांव बँकर्स असोसिएशनमध्यें श्री.सरय्या ह्यांचा सत्कार

बेळगांव बँकर्स असोसिएशनतर्फे बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड मुंबई या बँकेचे व बॉम्बे स्टेट ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशनचे चेअरमन श्री. आर. जी. सरय्या यांचा मंगळवार ता. १९-४-५५ रोजीं सकाळीं ११-३० वाजतां डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या इमारतींत बँकर्स असोसिएशनच्या वतीनें सत्कार करण्यांत आला. यावेळीं श्री. देशमुख-इंपीरिअल बँक, श्री. के. नागेशराव-कॅनरा बँक, श्री. बी. बी पोतदार-पायोनियर अर्बन को. ऑ. बँक, श्री. उगरगोल-डि. सेंट्रल को. ऑ. बँक व श्री. सराफ-बँक ऑफ सिटिझन्स, वगैरे मंडळी उपस्थित होती.

आरंभीं असोसिएशनचे चेअरमन श्रीयुत जी. डी. सराफ यांनीं श्री. सरय्या यांचें स्वागत केलें नंतर बँकिंग विषयावर थोडी चर्चा झाली. श्री. सरैय्या यांना बँकर्स असोसिएशनतर्फे पुष्पहार अर्पण केला गेला व आभारप्रदर्शनानंतर हा गोड समारंभ समाप्त झाला.

---

### इंपीरिअल बँकेचे भागीदार

इंपीरिअल बँकेच्या भागीदारांपैकी ९,७८५ भागीदार हिंदी असून ते ६१·७% भाग धारण करीत आहेत. ६१६ परदेशीयांचे जवळ १०·६% भाग आहेत. ३२४ ट्रस्ट व कंपन्या ह्यांचेजवळ २७·७% भाग आहेत. सर्व भागीदारांना मिळून १९·९ कोटी रुपये नुकसानभरपाई मिळेल.

---

तंत्रज्ञांना शिक्षण—ऑटोमोबाइल एंजिनिअरिंग ह्या विषयाचा अधिक अभ्यास करण्यासाठीं मुंबई राज्याच्या स्टेट ट्रॅन्सपोर्ट सर्व्हिसमधील ९ तंत्रज्ञांना ब्रिटन व अमेरिका ह्या देशांना पाठविण्यांत येणार आहे. विजापूर येथील एक तंत्रज्ञ श्री. पन्नालाल शहा हे त्यांत आहेत. ते ब्रिटनमधील आल्बिअन व लेलंड ह्या कारखान्यांतून शिक्षण घेणार आहेत.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८१

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यात येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रानडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

### मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. वेर्चा — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.